| दिनांक 27/04/2025 |
| --- |
| **1.** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/04/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास महिला फिर्यादी रा. खांब आदीवासीवाडी ता रोहा यांचे घरासमोर रस्त्यावर खांब आदीवासीवाडी ता रोहा येथे फीर्यादी व आरोपी एकाच गावात राहणारे असुन ते एकमेकांच्या शेजारी राहतात आरोपीत यांची मुलगी ही फीर्यादी यांचे घरासमोर फीर्यादी यांनी भरलेले पाण्याचे भांडे उपसत होती म्हणुन फीर्यादी ही तीस ओरडली आसता ती बाब मुलगी हीने आरोपीस सांगीतले त्या गोष्टीचा आरोपी यांने मनात राग घरुन फीर्यादी यांना म्हणाल्या की मुलीला का ओरडलीस? व मारलीस असे बोलुन आरोपीत यांने फीर्यादीस शिवीगाळी करुन हाताबुक्याने मारहान करुन फीर्यादीस रस्त्यावर ढकलुन दिले फीर्यादी या रस्त्यावर पडल्याने त्याच्या डोक्याच्या मागील बाजुस दुखापत झाली.<br>याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.36/2025, भारतिय.न्याय.संहीता 2023 चे कलम 115,125,125(a),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/मंगेश पाटील हे करीत आहेत. |
| **2.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/07/2024 रोजी 00:00 वा ते दि. 25/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान आरोपीत याने पीडीत अल्पवयील मुलीस ती अल्पवयीन असल्याचे माहित असुन तीस फुस लावुन पळवुन नेवून तिचे अज्ञातपणाचा फायदा घेवुन तिचे ईच्छेविरूध्द शारिरीक संबंध ठेवून तिला गरोदर ठेवले.<br>याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं. 44/2025, बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 चेकलम 4,6, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137(2),64(2)(m),65(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री. मुंढे हे करीत आहेत. |
| **3.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/04/2025 रोजी 22:30 वा च्या सुमारास मौजे तळकरनगर अलिबाग येथे घराची शेड बांधण्याच्या कामावरुन आरोपीत क्र 1 व आरोपीत क्र 2 यांनी महिला फिर्यादी रा. तळकरनगर अलिबाग यांच्या वडीलांना येथे शेड बांधायची नाही असे धमकावुन शिवीगाळी केली म्हणून फिर्यादी व फिर्यादी यांची आई त्याचे चुलते व भाउ असे भांडण सोडवीण्यासाठी मध्ये गेले असता आरोपीत क्र.01 व आरोपीत क्र. 02 यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी धक्काबुक्की करुन हाताबुक्यानी मारहाण केली तसेच आरोपीत क्र 01 याने त्याच्या हातातील कोयता फिर्यादी यांच्या वडीलांच्या डोक्यात मारला व हातातील चैनने तोंडावर |

फाइटी मारल्या व तेथुन पळुन जाताना कापुन तुकडे करु अशी धमकी दिली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.75/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),115(2),352,351(2) (3), 3 (5 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सागर राउत हे करीत आहेत.

**4.** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 07:00 वा च्या सुमारास मौजे जामगाव गावचे हददीत आठलेवाडी ते जामगाव रोडवर ता रोहा येथे आरोपीत चालक रा.कोलाड आंबेवाडी ता रोहा यांने त्यांचे ताब्यातील एसटी बस क्र एम एच 20 बी एल 2620 ही स्वत: आठवलेवाडी ते जामगाव रोडने चालवीत घेवुन जात असताना रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन धोकादायक पदधतीने अतिवेगात चालवुन जामगाव स्मशानभुमी या रोडच्या समोर आले वेळी समोरुन येनारी मोटार सायकल क्र एम एच 06 बी टी 3559 हिस समोरुन ठोकर मारुन मोटारस्चार नामे सुदाम रामचंद्र येरम यांचे लहान मोठया तसेच गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस व दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभूत झाला.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं. 37/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 , भा.न्या.संहीता 2023 चे कलम 281,125(a), 125(b),¨ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/जाधव हे करीत आहेत.

**5.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे तिनघर नाका जुन्या मुंबई पुणे हायवे रोडवर येथे फिर्यादी रा. अंजिक्सतारा मंडळख, साठेनगर वाबाळे ईस्टेट, गल्ली नं.2 ठाणे हे त्यांचे ताब्यातील हिरो मोटो कॅप लि.एक्स प्लस 2004 व्ही क्र. एमएच 04 एलझेड 1208 हिच्यावर पाठीमागे साक्षीदार हिला बसवुन सदरची मोटार सायकल ही कारला येथुन ठाणे येथे जुन्या मुंबई पुणे हायवेने स्वत: चालवीत घेवुन जात असताना तिनघर नाका जुन्या मुंबई पुणे हायवे रोडवर आरोपी चालक रा. तारापुर चौक ता. खालापुर याने त्याचे ताब्यातील पिकअप टेम्पो क्र.नं. - एमएच 46 ऐएफ 2968 ही मुंबई पुणे जुन्या हायवेने मुंबई बाजुकडुन पुणे बाजुकडे रस्त्याचे रॉग साईडने मुंबई लेथने चालवित घेवुन येवुन फिर्यादी यांचे ताब्यातील मोटार सायकलला ठोकर मारुन अपघात करुन सदर अपघातामध्ये फिर्यादी व साक्षीदार यांच्या लहान मोठया गंभीर दुखापतीस कराणीभुत झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.128/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 281 ,125ए,125 बी सह मोटार वाहन कायदा कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/ विशाल शिंदे हे करीत आहेत.

**6.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे तांबटआळी म्हसळा येथे फिर्यादी रा.श्रीवर्धन डेपो ता- श्रीवर्धन त्याचे ताब्यातील बस क्र एचएम 06 बीडब्लु 8157 ही म्हसळा बाजुकडुन माणगाव बाजुकडे म्हसळा बाजारपेठेतुन जात असताना तांबटआळी म्हसळा येथे आलेवेळी आरोपीत रा.आगरदंडा मुरुड याने त्याचे ताबेतील व्यगनर क्र एम एच 06 सीएल 6647ही माणगाव बाजुकडुन स्वत: वालवित घेवुन येत असताना

रस्ता अरुदं असलयाने फिर्यादी यांनी त्यांचे ताब्यातील बस बसजुला घेत असताना आरोपीत याची व्यगनर कार थोडीशी घासुन गेली  म्हणुन आरोपीत याला राग येवुन रागाच्या भरात आरोपीत याने फिर्यादी यांना शिवीगाळी करुन हाताबुक्कयाने मारहान करीत असताना साक्षीदार कन्डक्टर हे फिर्यादी यांना वाचविण्याकरीता गेले असता आरोपीत याने त्यांना देखील शिवीगाळी करुन  मारहान करुन एसटी बस ची चावी काढुन ती फेकुन दिली.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं. 24/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,132,115 (2),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/ज्ञानेश्वर एडवळे हे करीत आहेत.

**7.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे नांवढे ता.खालापुर गावचे हददीत खोपोली कर्जत रेल्वे लाईन कि.मी स्टोन क्रं 107/4 चे ब्रिजचे जवळ या ठिकाणी अनोळखी पुरुष वय अंदाजे 40 ते 50 यास कोणीतरी अज्ञात आरोपीत यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणामुळे त्याचे डोक्यात कोणत्यातरी हत्याराने जखम करुन त्यास जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचेवर दगड रचुन ठेवले आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.129/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 103 (1) ,238 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि. सचिन पवार हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 26.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 291 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून  3,02,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.